# पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
# नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
# दिनांक 14/01/2020 (मंगळवार)
# (सकाळ)

---

## खून

पो.स्टे. सावनेर :– अंतर्गत 02 कि. मी अंतरावर नागमंदीर जवळ गुप्ता गॅरेज समोर नागपूर रोड, सावनेर येथे दिनांक 12/01/2020 चे 20:30 वा. ते 20:45 वा. दरम्यान अंगद रविन्द्र सिंग (मृतक), वय 34 वर्ष, रा. वेकोली, वाघोडा, सावनेर व आरोपी नामे– नरेन्द्र जयशंकर सिंग, वय 29 वर्ष, रा. डब्लु.सि.एल. वाघोडा सावनेर हे मित्र असुन यांच्यात जिमचे वर्चस्वचे कारणावरून नेहमी वादविवाद होत होता. या कारणावरून आरोपीने अंगद सिंग यास धारधार शस्त्रानी मारहाण करून गंभीर जखमी करून जिवानीशी ठार मारले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– आशिष बळीरामजी मंडपे, वय 30 वर्ष, रा. सेंबेकर ले आऊट, रेल्वे स्टेशन मागे, खापा रोड, सावनेर यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. सावनेर येथे आरोपीविरुध्द कलम 302 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीला अटक करण्यात आली आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक श्री. करांडे 7722011228 हे करीत आहे.

## चोरी

पो.स्टे. मौदा :– अंतर्गत 05 कि. मी अंतरावर माथनी मौदा येथे दिनांक 13/01/2020 चे 15:00 वा. दरम्यान फिर्यादी नामे– मोहम्मद सकुर अन्सारे, वय 55 वर्ष, रा. माथनी मौदा यांनी पंचरच्या दुकानात पॅन्ट मध्ये 10,000/–रू. किमतींचा ओपो कंपनीचा मोबाईल ठेवला असतांना आरोपी नामे– पवन कैलाश राउत, रा. दिग्रस यवतमाळ घेउन जातांनी दीसला. पोलिसांनी चेक केले असता आरोपीच्या मागच्या खिश्यात मोबाइल मिळुन आला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. मौदा येथे आरोपीविरुध्द कलम 379 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीला शोध घेणे सुरू आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार कुथे हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर